पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा. महिला व बाल कल्याण समिती
कार्यपत्रिका क्रमांक - ६
**सभावृत्तांत**

दिनांक :- २७ / ०६ / २०१२ वेळ :- दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बाल कल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक - २७ / ०६ / २०१२ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. भारती फरांदे - सभापती
२) मा. जवळकर वैशाली राहुल
३) मा. सौ. साळुंके सविता सुरेश
४) मा. सौ. ठाकरे मंदाकिनी अर्जुन
५) मा. काळे विमल रमेश

याशिवाय मा.गायकवाड - सहा.आयुक्त, मा. चाकणकर - प्र.नगरसचिव, मा.जगताप - समाज विकास अधिकारी, मा. जगदाळे - सहा. प्रकल्प अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा. सदस्यांच्या संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला -

विषय क्रमांक ३ :- मनपा शाळेतील इ. १० वीला ८०% गुण मिळवून उत्तीर्ण होणा-या विद्यार्थीनींना मोफत संगणक देणेबाबत - मा.सविता साळुंके मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक - १३/०६/२०१२ (दु.२.०० व दु.२.१५) रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ५) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा. सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - ६ विषय क्रमांक - १
दिनांक - २७/०६/२०१२ विभाग - नागरवस्ती विकास योजना
सूचक - मा.सविता साळुंके अनुमोदक - मा. विमल काळे
संदर्भ - मा. अति.आयुक्त यांचे पत्र क्र.नावियो/९/कावि/२६६/२०१२, दि. १९/०६/२०१२

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महिला व बालकल्याण योजना - मुलगी दत्तक घेणा-या दांपत्यांस अर्थसहाय्य देणे या योजनेअंतर्गत प्रस्तावात नमुद एकूण तीन पात्र अर्जदारांचे आई व मुलगी यांचे संयुक्त नावे राष्ट्रीयकृत बँकेत मुदतठेव पावती स्वरुपात प्रत्येकी र.रु.१०,०००/- (अक्षरी र.रु.दहा हजार फक्त) प्रमाणे रक्कम रुपये ३०,०००/- ( अक्षरी र.रु.तीस हजार फक्त )अदा करणेस मान्यता देणेकामी मा. स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा. स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ७ विषय क्रमांक - २
दिनांक - २७/०६/२०१२ विभाग - नागरवस्ती विकास योजना
सूचक - मा.वैशाली जवळकर अनुमोदक - मा. मंदाकिनी ठाकरे
संदर्भ - मा. अति.आयुक्त यांचे पत्र क्र.नावियो/९/कावि/२६७/२०१२, दि. १९/०६/२०१२

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पहिल्या मुलीवर कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया करणा-या अथवा पहिली मुलगी असताना दुसरी मुलगी झाल्यास दुस-या मुलीवर कुटूंब नियोजन करणा-या महिलेस अर्थसहाय्य देणे योजने अंतर्गत प्रस्तावात नमुद एकूण दोन पात्र अर्जदारांचे आई व मुलगी यांचे संयुक्त नावे राष्ट्रीयकृत बँकेत मुदतठेव पावती स्वरुपात प्रत्येकी र.रु.१०,०००/- (अक्षरी र.रु.दहा हजार फक्त) प्रमाणे रक्कम रुपये २०,०००/- (अक्षरी र.रु.वीस हजार फक्त) खर्च अपेक्षित असल्याने त्यास व सदर रक्कमअदा करणेस मान्यता देणेकामी मा. स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा. स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेला विषय घेणेत आला -

ठराव क्रमांक - ८ विषय क्रमांक - ३
दिनांक - २७/०६/२०१२
सूचक - मा.सविता साळुंके अनुमोदक - मा. मंदाकिनी ठाकरे
संदर्भ - मा. सविता साळुंके, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव -

मा. महिला बालकल्याण समिती सभा ठराव क्र.५ दि. २३/०५/२०१२ मध्ये अट क्र.६ “महापालिकेच्या मा.माध्यमिक शिक्षण अधिकारी यांचे शिफारशीसह मनपा शाळेतील ८०% पेक्षा

अधिक गुण मिळालेल्या विद्यार्थिनींची नांवे, पत्ते, शांळेचे नाव, मिळालेले गुण इ. माहितीसह प्राप्त यादीनुसार विद्यार्थिनींना संगणक देय राहील ” चा समावेश करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

या नंतर मा. सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( भारती फरांदे )**
सभापती
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस/४/कावि/ ९५१ /२०१२
दिनांक :- २९/०६/२०१२

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत : सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

\\Nagersachiv४\nnn\Nagersachiv१\mahila-११-१२\agenda-२doc.